# कार्यालय
# कृषी उत्पन्न बाजार समिती,वाशिम ता.जि.वाशिम

# वार्षिक अहवाल सन २०२४-२०२५

## ( दिनांक ०१ एप्रील २०२४ ते ३१ मार्च २०२५ )

**प्रस्तावीक :-**

वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीची स्थापना दिनांक १०/०७/१८९९ नुसार हैद्राबाद रसीडेंन्सी ॲक्ट प्रमाणे झालेली आहे.सद्याचे कामकाज महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम १९६३ व १९६७ प्रमाणे चालु आहे. वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीस १२६ वर्ष पुर्ण झाले आहे. वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीची रचना बाजार समितीच्या कायदयातील कलम १३ नुसार करण्यात आलेली असुन, सेवा सहकारी संस्था याच्या व्यवस्थापन समितीच्या सदस्याने निवडुन दिलेले एकुण ११ सदस्य त्यामध्ये २ महिलांचा समावेश आहे.

**ग्रामपंचायत सदस्यांनी निवडुण दिलेले ४ सदस्य**
**लायसन्स धारक हमाल मापारी यांनी निवडुण दिलेले १ सदस्य**
**लायन्सस धारक व्यापारी व अडते यांनी निवडुण दिलेले २ सदस्य**
**असे एकुण १८ सदस्य तसेच मा.सहाय्यक निबंधक,वाशिम १ प्रतिनिधी, याप्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये संचालक मंडळ कार्यरत आहेत.**

**कार्यक्षेत्र :-**

वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीचे कार्यक्षेत्र वाशिम तालुका पुरते मर्यादित असुन सदर कार्यक्षेत्रात एकुण १३० खेडयाचा समावेश आहे.वाशिम बाजार समितीनी अनसिंग येथे उपबाजार आवाराची स्थापना १९७१ मध्ये केलेली असुन सदर उपबाजारास २५ खेडयाचा शेतमाल विक्रीसाठी येतो. तसेच वाशिम बाजार समितीचे उपबाजार राजगांव आवाराची स्थापना दिनांक ०४/०१/२००७ रोजी केली आहे. वाशिम मुख्य यार्ड करीता ११ हेक्टर २४ आर जमीन आहे. उपबाजार अनसिंगचे ४ हेक्टर ८६ आर आहे. तसेच उपबाजार राजगांव क्षेत्र ४ हेक्टर जमिन खरेदी केलेली आहे.

तसेच मागील आमसभेमध्ये पार्डी टकमोर येथे उपबाजार चालु करणे बाबत काही कास्तकारांनी प्रश्न मांडला होता. तसेच त्यावर वाशिम बाजार समितीचे संचालक श्री.विठ्ठल उर्फ राजुभाऊ चौधरी यांनी सुध्दा दिनांक २०/०८/२०२४ रोजी दिलेल्या पत्रामध्ये नमुद केल्यानुसार वाशिम बाजार समितीचे पार्डी टकमोर येथे शेतकऱ्यांच्या दृष्टीने उपबाजार चालु करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यावर वाशिम बाजार समितीचे सभापती श्री.महादेव पुं.काकडे साहेब यांच्या आदेशानुसार व सर्व सन्मानीय संचालक यांच्या सहकार्याने पाठपुरावा करून पार्डी टकमोर येथे लवकरच उपबाजार चालु करण्यात येईल.

## नियमन :-

वाशिम मुख्य बाजार व उपबाजार अनसिंग येथे कापुस, उडिद, मुंग, गहु, सोयाबीन, चना, तुर,हळद,चिया इत्यादी एकुण २९ शेतमालाचे नियमन करण्यात आलेले आहे.

वाशिम बाजार समितीनी भाजीपाला व फळफळाचे सुध्दा नियमन करण्यात आलेले असुन नोटीफिकेशन नुसार सदर शेतीमाल कायद्यानुसार नियंत्रीत करण्यात आला आहे.परंतु अहवाल वर्षात सदर बाजार समितीच्या अधिपत्याखाली भरविण्यात येत आहे.

## शेतमालाची आवक :-

**मुख्य यार्ड वाशिम व अनसिंग उपबाजार समितीमध्ये प्रामुख्याने खालील शेतमालाची आवक येते.**

१) सोयाबीन २) तुर ३) उडिद ४) चना ५) मुंग ६) गहु ७) करडी ८) हळद ९) ज्वारी १०) कापुस ११) चिया व इतर शेतीमाल

## वाशिम व उपबाजार अनसिंग चे अहवाल वर्षात २०२४-२०२५ शेतमालाची आवक खालील प्रमाणे आलेली आहे.

**एकुण आवक :- २०,९६,३३१/- क्विंटल**

| अ.क्र | शेतमालाचे नांव | एकुण आवक (क्विंटल) | सरासरी भाव | किंमत |
|---|---|---|---|---|
| **१.** | सोयाबीन | १२६३३१४ | ४३०० | ५४३२२५०२०० |
| **२.** | मुंग | ३५८३५ | ६५०० | २३२९२७५०० |
| **३.** | उडीद | ६६५९ | ६५०० | ४३२८३५०० |
| **४.** | ज्वारी | १७६२१ | १९०० | ३३४७९९०० |
| **५.** | तुर | २७५०२४ | ७५०० | २०६२६८०००० |
| **६.** | हरभरा | १८९५८३ | ६००० | ११३७४९८००० |
| **७.** | गहु | १२१४४९ | २५०० | ३०३६२२५०० |
| **८.** | कापुस | ५८७२३ | ६८०० | ३९९३१६४०० |
| **९.** | तीळ | २२ | १०५०० | २३१००० |
| **१०.** | हळद | ११९४२४ | १३००० | १५५२५१२००० |
| **११.** | मका | ३० | २२०० | ६६००० |
| **१२.** | करडी | २६६ | ३००० | ७९८००० |
| **१३.** | मोहरी | १०२ | ४३०० | ४३८६०० |
| **१४.** | जवस | १४ | ४५०० | ६३००० |
| **१५.** | चिया | ८२६० | १४००० | ११५६४००००० |
| **१६.** | कस्तुरी भेंडी | ५ | १९००० | ९५००० |
| | **एकुण** | **२०,९६,३३१** | | **११,३१,४९,०१,६००** |

**प्रामुख्याने सदर अहवाल वर्षात सोयाबीन हया शेतमालाची सर्वात जास्त आवक झालेली आहे.**

## अनुज्ञपती (लायसन्स) :-

**मुख्य बाजार वाशिम व अनसिंग उपबाजार समितीचे अहवाल वर्षात खालील प्रमाणे अडते,व्यापारी,हमाल,मापारी,मदतनीस यांना बाजार समितीने अनुज्ञप्ती/लायसन्स दिलेले असुन त्यांची संख्या अनुज्ञप्ती फी चा तक्ता खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र | अनुज्ञप्तीधारक | संख्या | दर | मिळालेले एकुण शुल्क |
|---|---|---|---|---|
| १. | आडते (नविन) | १३ | ५००० | ६५००० |
| २. | आडते (नुतणीकरण) | १२७ | २००० | २५४००० |
| ३. | व्यापारी (नविन) | ३० | ५००० | १५०००० |
| ४. | व्यापारी (नुतणीकरण) | ११६ | २००० | २३२००० |
| ५. | मापारी (नविन) | ९ | ५० | ४५० |
| ६. | मापारी (नुतणीकरण) | ५८ | ५० | २९०० |
| ७. | मतदनीस (नुतणीकरण) | १८ | ५० | ९०० |
| ८. | मतदनीस (नविन) | १ | १०० | १०० |
| ९. | वखार मंहामंडळ (नुतणीकरण) | १ | २००० | २००० |
| १०. | हमाल (नुतणीकरण) | ३१४ | १० | ३१४० |
| ११. | हमाल (नविन) | २३ | २० | ४६० |
| १२. | प्रक्रीया (नुतणीकरण) | २ | २००० | ४००० |
| १३. | प्रक्रीया (नविन) | १ | ५००० | ५००० |
| १४. | भाजीपाला आडत (नुतणीकरण) | १३ | २००० | २६००० |
| १५. | भाजीपाला आडत (नविन) | २ | ५००० | १०००० |
| | **एकुण** | **७२८** | | **७,५५,९५०** |

### उपबाजार अनसिंग येथील अनुज्ञप्ती फी चा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | अनुज्ञप्तीधारक | संख्या | दर | मिळालेले एकुण शुल्क |
|---|---|---|---|---|
| १. | आडते (नविन) | २ | ५००० | १०००० |
| २. | आडते (नुतणीकरण) | २८ | २००० | ५६००० |
| ३. | व्यापारी (नविन) | ७ | ५००० | ३५००० |
| ४. | व्यापारी (नुतणीकरण) | ३१ | २००० | ६२००० |
| ५. | मापारी (नुतणीकरण) | १६ | ५० | ८०० |
| ६. | हमाल (नुतणीकरण) | ८९ | १० | ८९० |
| ७. | हमाल (नविन) | २५ | २० | ५०० |
| | **एकुण** | **१९८** | | **१६५१९०** |

बाजार समितीला अहवाल वर्षात अनुज्ञप्ती फी बाबत रूपये ९,२१,१४०/- उत्पन्न झालेले आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन विनियम अधिनियम १९६३ व नियम १९६७ मधील तरतुदीनुसार बाजार समितीच्या नियमनाखाली शेतीमालाचा घाऊक व्यापार करणाऱ्या घटकांना तसेच बाजार समितीचे आवारातील संबंधीत घटकाला बाजार समितीची अनुज्ञप्ती घेणे बंधनकारक आहे.

## वेअर हाऊस :-

वाशिम येथे सन ७३-७४ मध्ये महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने कामास सुरूवात केली त्यांनी १७२२ मेट्रीक टन व २२५० मेट्रीक टन क्षमतेचे गोदामे मार्केट यार्डने दिलेल्या जागेवर बांधलेले असुन त्याची क्षमता १०,५००/- मेट्रीक टनाची आहे.तसेच जिल्हा माकेटींग फेडरेशनचे १२०० मेट्रीक टनाचे गोडावुन बांधलेले आहे.बाजार समितीने सुध्दा गोदामे बांधलेले असुन यार्डमध्ये अनुज्ञप्ती धारक व्यापारी यांना दिलेले आहे.

## वाशिम मुख्ययार्ड शेतकरी यांच्याकरीता सुविधा:-

वाशिम बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना शेतीमाल विक्री करीता खालील सुविधा करून दिलेल्या आहेत.

१) शेतमाल टाकण्याकरीता १० ओटे तसेच ३ डोमशेड
२) सर्व ओटयाचे बाजुने सर्व सिमेंट रोड केलेले आहेत
३) संपुर्ण यार्डमध्ये विद्युत व्यवस्था
४) वॉटर फिल्टरचे पिण्याकरीता पाणी
५) सर्व ओटयावर व यार्डमध्ये सि.सि.टी.व्ही.कॅमेरे लावण्यात आलेले आहे.
६) शेतकऱ्यांची फसवणुक न होण्याकरीता बाजार समितीने स्वत:हा ५० इलेक्टॉनिक वजन काटयांची व्यवस्था केलेली आहे.
७) शेतकऱ्यांचा शेतमाल ओटयावर ढिग टाकुन ओपन हर्राशी लावणे
८) शेतकऱ्यांकरीता अत्यधुनिक शेतकरी निवास व स्वतंत्र रूमची व्यवस्था

**इत्यादी सुविधा शेतकरी यांच्याकरीता बाजार समितीकडुन करण्यात आलेल्या आहेत.**

तसेच वाशिम बाजार समितीनी कार्यालयाकरीता दुमजली इमारत बांधलेली आहे.अंतर्गत सिमेंट रोड,विद्युत व्यवस्था,पाण्याची व्यवस्था ,गुरांकरीता पिण्याचे पाण्याचे हौद,बाजार माहिती केंद्र ,उपहार गृह ,सभापती निवास ,ग्रेडींग युनिट,इमारत २,शॉपींग कॉम्पलेक्स २६०,गोदाम २१ ,संपुर्ण यार्डला कॅपाऊंड ,पाण्याची टाकी, कास्तकारांना दररोज शेतीमाल पाहणे करीता स्वतंत्र माहिती केंद्रामध्ये प्रोजेक्शन टी.व्ही.बसविलेला आहे व इतर सर्व प्राथमिक स्वरूपाच्या सुविधा बाजार समितीनी उपलब्ध करून दिल्या आहेत.गुरांचे बाजारात स्वतंत्र विद्युत व्यवस्था केलेली आहे.तसेच गुरांचा बाजार चालु केला आहे.

तसेच अनसिंग उपबाजार आवारात सुध्दा खालील प्रमाणे सुविधा करण्यात आलेल्या आहेत धान्याचे ओटे/टिनशेड ३,डोमशेड-३,अंतर्गत रस्ते,विद्युतीकरण,पाण्याची टाकी,शेतकरी निवास,कार्यालय इमारत,सिमेंट रोड, गोदाम -१८,वॉल कंपाऊंड ,शॉपींग

कॉम्पलेक्स-४५ ,कर्मचारी निवास तसेच अनसिंग उपबाजार आवारात गुरांचा बाजार चालु केला आहे.तसेच शेतकऱ्यांच्या शेतमालाचे चोख वजन माप होण्याकरीता इलेक्ट्रीक वजनकाटे ५० लावले आहे.

तसेच बाजार समितीनी राजगांव येथे उपबाजार आवार स्थापना दिनांक ०४/०१/२००७ पासुन चालु केलेला आहे व त्या ठिकाणी धान्याचा ओटा-१ व त्यावर टिनशेड, कार्यालयीन इमारत ,गोदाम-२, अंतर्गत रस्ते पाण्याची व विद्युतची व्यवस्था केलेली आहे.राजगांव उपबाजार बाबत शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांच्या कोणत्याही अफवावर विश्वास न ठेवता आपल्या शेतमालाचे योग्य वजन व त्याचे नगदी पैसे (पेमेन्ट) व इतर अडीअडचणीवर योग्य विचार केला जाईल तरी आपण आपला शेतमाल राजगांव उपबाजार येथे विक्री करीता आणावा.

वाशिम बाजार समितीनी शेतकऱ्यांना दररोज शेतमालाचे भावाची माहीती मिळावी या दृष्टीने सन २००१-२००२ मध्ये कृषी पणन मंडळ पुणे यांचे सुचनेप्रमाणे बाजार समितीनी माहीती केंद्राची स्थापना केलेली आहे.सदर टि.व्ही.नाशिक येथील कंपनीकडुन घेतलेली आहे.सदर प्रोजेक्शन टि.व्ही.वर दररोज कृषी पणन मंडळास भाव दिल्या जातात.शेतकऱ्यांना इतर बाजार समितीमध्ये दररोज होणात्या शेतमालाच्या भावाची माहीती दाखविण्यात येते.सदर टि.व्ही.चालविणे बाबत १ कर्मचारी नेमला आहे.सदर प्रोजेक्शन टि.व्ही.करीता स्वतंत्र खोलीची व्यवस्था केलेली आहे.तसेच इंटरनेट वरून व स्वाफ्टवेअर द्वारे (टेलीफोन वरून) खेडयापाडयामध्ये शेतकऱ्यांना बाजार भावाची माहीती व्हावी या करीता लवकर प्रयत्न करण्यात येत आहेत.तसेच सदर टि.व्ही.वर कास्ताकारांना सि.डी.द्वारे शेती विषयक माहीती दाखविण्यात येते.

बाजार समिती लवकरच माहीती केंद्रामध्ये शेतकऱ्यांचे सोयीचे शेती उपयोगी पुस्तके ठेवुन व नियमाचे पुस्तक ठेवुन लायब्ररी ची व्यवस्था करण्यात येत आहे.त्याकरीता स्वतंत्र अलमारी व शेतकऱ्यांना बसण्याकरीता खुर्च्याची व्यवस्था करण्यात येत आहे.कास्तकारांनी संबंधीत असलेल्या योजनेचा फायदा घ्यावा.

गुरांचे बाजार करीता स्वतंत्र जागेवर वॉल कंपाउंड केलेले आहे व सदर वर्षात बाजार समितीनी एकुण ६०० झाडे लावण्याचा विचार आहेत त्यामध्ये वड, कडु लिंब व इतर झाडे लावण्यात येणार असुन त्या झाडाची निगा ठेवणे,काटयाचे कुंपन लावणे इत्यादी कामे बाजार समिती अंतर्गत करण्यात येईल.

**वाशिम बाजार समितीमध्ये राबविण्यात येणाऱ्या योजना :-**

१) वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीकडुन सन २०१६-२०१७ या वर्षापासुन जिल्हयातील व इतर जिल्हयातील शेतकऱ्यांना व्हॉटअप गृप तयार करून बाजार समितीचे निरीक्षक यांच्या द्वारे शेतमालाचे दररोज भाव व बाजार समिती चालु किंवा बंद असल्याबाबत सुचना पाठविण्यात येतात.

२) वाशिम बाजार समितीचे कार्यालया बाहेर लावण्यात आलेल्या तसेच ओटयावर लावलेले डिस्प्ले बोर्डद्वारे बाजारभाव दर्शविण्यात येतात व त्याचा फायदा शेतकऱ्यांना होतो.

३) मा.कृषी पणन मंडळाचे ॲप (MSAMB) व वेब साईटवर दररोजचे बाजारभावा बाबत माहीती बाजार समितीकडुन टाकण्यात येते त्यावर शेतकऱ्यांना सर्व बाजार समितीमधील बाजार भाव बाबत माहीती पाहता येते.

४) केंद्र शासनाच्या कृषी व शेतकरी कल्याण विभागा मार्फत राष्ट्रीय कृषी बाजार (ई-नाम) सन २०१६ पासुन कार्यान्वित केले आहे. तरी वाशिम बाजार समितीचे कामकाज ई-नाम योजने अंतर्गत करण्याकरीता दिनांक १६/११/२०१९ नुसार ई-नाम योजनेमध्ये नांव समाविष्ठ करण्यात आले आहे. त्याप्रमाणे बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांचा शेतमाल ऑनलाईन खरेदी -विक्री करणे कशा पध्दतीने करावा याचे संपुर्ण प्रशिक्षण मा.महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ,पुणे यांच्या मार्फत ऑनलाईन व ऑफलाईन शेतकरी व व्यापारी/आडते व सबंधीतांना वेळोवेळी देण्यात येते आहे. तरी याबाबत बाजार समितीचे कर्मचारी यांच्याकडुन आपणास बाजार समितीचे व्हॉटॲप ग्रुपद्वारे प्रशिक्षण असल्याबाबत वेळोवेळी माहीती पाठविण्यात येत असते तरी आपण या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा. या योजनेची १००% अंमलबजावणीकरीता बाजार समितीकडुन शेतकरी व व्यापारी व इतर घटकांना ई-नाम अंतर्गत शेतमाल खरेदी-विक्री करण्यासाठी प्रोत्साहीत करण्याचा प्रयत्न बाजार समितीकडुन करण्यात येत आहे. वाशिम बाजार समितीचे वतीने सर्व शेतकरी व व्यापारी यांना कळविण्यात येते की, ई-नाम द्वारे ऑनलाईनद्वारे शेतमालाची खरेदी - विक्री चालु असुन तरी सर्व व्यापारी-आडते व शेतकरी यांनी त्यांचा शेतमाल राष्ट्रीय कृषी बाजार (ई-नाम) अंतर्गत ऑनलाईन खरेदी-विक्री करावा.

## वाशिम व उपबाजार समिती अनसिंग येथील झालेले एकुण उत्पन्न व एकुण खर्च बाबत माहीती खालील प्रमाणे
## (सन २०२४-२०२५)

| उत्पन्न बाजु | | खर्च बाजु | |
|---|---|---|---|
| मार्केट फी | ८०९५७५३१ | सभा व सदस्य खर्च | १६८२५९४ |
| अनुज्ञप्ती फी | ९२११९० | आस्थापना खर्च | २११२४६२६ |
| इमार भाडे | ३८०३११३ | प्रशासकीय खर्च | ३४८६८४११.९२ |
| गुरांचा दाखला | १५४१९३० | - | |

| | | | |
|---|---|---|---|
| इतर उत्पन्न | ५८८७१९६.७८ | - | |
| | | **एकुण खर्च** | **५७६७५६३१.९२** |
| | | **वाढावा** | **३५४३५३२८.८६** |
| **एकुण उत्पन्न** | **९३११०९६०.७८** | **एकुण उत्पन्न** | **९३११०९६.७८** |

शेतकऱ्यांनी जर बाजार समितीला योग्य सहाकार्य केले तर व्यापाऱ्याकडुन बाजार समितीला वसुलीची कार्यवाही करणेस मदत होईल परंतु बरेच ठिकाणी असा अनुभव आला आहे की,शेतकरी वर्ग व्यापाऱ्यांना साथ देऊन त्या ठिकाणी बाजार समितीस सहकार्य मिळत नाही.त्यामुळे व्यापारी वर्ग अनाधिकृत खरेदी करून स्वत:हा चा फायदा करून घेतात व बाजार समितीला आर्थिक नुकसान सहन करावे लागते.त्यामुळे बाजार समिती शेतकऱ्यांकडुन अपेक्षा करते की,त्यांनी आपला शेतमाल मार्केट यार्डवरच विक्रीसाठी आणुन कायदयातील तरतुदी नुसार संरक्षण प्राप्त करून घ्यावे.आपली होणारी फसवणुक टाळावी अशी बाजार समिती आपणा कडुन अपेक्षा करते.

## हमाल माथडी कायदा बाबत :-

वाशिम बाजार समितीनी हमाल माथाडी कायदा हा दिनांक ०१/१२/२००४ पासुन लागु केलेला आहे.सदर कायदा बाजार समितीत राबविणारे हमाल व मापारी या लोकांकरीता बाजार समितीनी ही योजना चालु केली आहे.सदर माथाडी कायदा लागु करीत असतांना ३०% लेव्ही ही व्यापाऱ्यांकडुन खरेदी केलेल्या मालाच्या हमालीवर कपात होते.सदर कपाती मधुन अवध्या १२ महीन्यात दिनांक ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ पर्यंत **हमाली माथाडी लोकांनी रू.१४,९५,८०४/-** रू दिवाळीचा वाटप बँकेद्वारे झालेला आहे.सदर रक्कमेची आयोजन बँके मार्फत केल्या जाते.तसेच ३०% लेव्ही ही कपात होते.सदर लेव्ही मधुन हमाल मापारी वर्गांना भ.निधी अंशदान म्हणुन १०% रक्कम व उपदान १% तसेच मडीकल बाबत १% आणि इतर रक्कम कपात होते.तसेच सदर माथाडी कायदयाखाली एकुण २०० सदस्य आहेत.त्यामध्ये अडते,व्यापारी हे ६५ सदस्य आहेत.सदर हमाल माथाडीचे काम सचिव सुरेश पाटणकर हे काम पाहतात त्यांनी सदर काम अत्यंत चांगल्या प्रकारे केले आहे.

## शेतमाल तारण कर्ज योजना :-

वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीनी सन २००७-२००८ मध्ये राबविणे बाबत महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे यांचे जा.क्र.कृपम/बास/शेतायो/२२९४/२००३ चे दिनांक २२/०९/२००३ चे पत्रानुसार व कृषी पणन मंडळ अमरावती यांचे जा.क्र कृपम/अम/शेता/कर्ज/०८३/२००४ दिनांक ०५/०८/२००४ चे पत्रानुसार सदर तारण योजना राबविण्यात यावी असा बाजार समितीनी तिचे साधारण सभा दिनांक

२४/०९/२००४ ठराव क्रमांक ०४ नुसार सदर सदर योजना राबविणे बाबत ठराव घेतला सदर ठरावानुसार बाजार समितीनी कृषी पणन मंडळ पुणे यांचेकडे प्रकरण मंजुरीसाठी पाठविले व सदर प्रकरणास सन २०१२-२०१३ हया काळात शेतमाल तारण कर्ज योजना राबविणे बाबत जा.क्र.कृमम/बाम/शेतायो/३४४९/२००८ दिनांक ०३/१२/२०१० नुसार मंजुरी मिळाली आहे.सन २०११-२०१२ हया हंगामात तुर,उडीद,मुंग,सोयाबीन व चना हया शेतमालावर शेतकऱ्यांना तारण (कर्ज ) योजना बाजार समितीनी सुरू केलेली आहे.सदर योजने नुसार शेतकऱ्यांनी ठेवलेल्या शेतमाल व त्या दिवशीचे बाजारर भाव लक्षात घेऊन ६०% रक्कम देण्यात येते सदर रक्कम ६% दराने ६ महीने मुदती करीता बाजार समितीनी तारण तोरण योजना लागु केली आहे.सदर योजना लागु केली आहे.योजना लागु करणे बाबत समितीनी पेपरला जाहीरात देऊन व बोर्ड तयार करून प्रसिध्दी दिली.त्याप्रमाणे बाजार समितीनी चालु वर्षात **सन २०२४-२०२५ मध्ये २० कास्तकारांना एकुण १८,१८,०००/- रूपयांचे वाटप बाजार समितीनी तारण योजनेखाली शेतकऱ्यांना कर्ज दिले.**सदर योजना राबविणे बाबात बाजार समितीचे सर्व संचालक व कर्मचारी वर्गाचे सहकार्य लाभले.

**तरी कास्तकार बंधुनी सदर शेतमाल तारण कर्ज योजनेचा अवश्य लाभ घ्यावा अधिक माहिती करीता कार्यालयाशी संपर्क साधावा.**

## १) मागील आमसभेमध्ये उपस्थित केलेले मुद्दे व त्यावर सन्माननिय संचालक मंडळानी केलेला पाठपुरावा.

वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीच्या समोरील अकोला-हिंगोली हायवे ला लागुन असलेली जमीनी बऱ्याच वर्षापासुन वादाच्या भवऱ्यामध्ये अडकलेली होती.

तसेच वाशिम बाजार समितीकडुन शेतकऱ्यांच्या हिताचा दृष्टीकोण लक्षात घेता सदर जागा दि.वाशिम जिनिंग सहकारी संस्था मर्यादित वाशिम यांना ९९ वर्षाच्या भाडेपट्टयावर दिलेली होती.तसेच सदर भाडेपट्टयामध्ये अट क्र.४ नुसार सदर जागेचा उपयोग ज्या उद्देशाकरीता दिलेली आहे त्याच करीता करावा इतर कोणत्याही उद्देशाकरीता वापर करू नये असे स्पष्ट लिहलेले असल्यामुळे सदर अटी व शर्ती चा भंग झाल्यामुळे बाजार समितीचे मा.सभापती श्री.महादेवरावजी काकडे साहेब यांच्या आदेशानुसार बाजार समितीचे तातडीचे साधारण सभा दिनांक १३/०७/२०२४ रोजीचे ठराव क्र.४ अ नुसार भाडेपट्टा रद्द करण्यात येत असल्याबाबत ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

तसेच जागेचे क्षेत्रफळ २.२२ हेक्टर असुन ज्या उद्देशाकरीता सदर जमीन देण्यात आली होती.तो उद्देश भंग पावल्याचे दिसत आहे.असे असतांना तात्कालीन अशासकीय प्रशासक मंडळाने सदर जमीन बाबत अशासकीय प्रशासक मंडळाच्या सभेतील ठराव क्र.६ दिनांक २२/०८/२०२० नुसार श्री.अभय क्रेन्स प्रा.लि.शेगांव यांना देण्यात आल्याचे मा.महादेवरावजी काकडे साहेब व सर्व सन्मानिय संचालक मंडळ यांच्या निदर्शनास आले तसेच मागील झालेल्या आमसभेमध्ये सदर मुद्दा शेतकरी वर्गामधुन उपस्थित केल्यामुळे सदर प्रकरणामध्ये वाशिम तालुक्यातील शेतकऱ्यांच्या व बाजार समितीच्या हिताच्या दृष्टीने हि जमीन परत मिळणे बाबत.योग्य ते पाऊले उचालविण्यात यावीत.असे सुध्दा सन्मानिय सर्व संचालक मंडळांना आमसभे दरम्यान सांगण्यात आले त्यावर मा.श्री.महादेवरावजी काकडे साहेब सभापती व सर्व सन्मानिय संचालक मंडळ यांनी सदर प्रकरण हाताळले. तसेच वाशिम बाजार समितीकडुन तक्रारदार मा.जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वाशिम यांनी दाखल केलेली मा.विभागीय सह.निबंधक अमरावती यांच्याकडे तात्कालीन अशासकीय प्रशासक मंडळाने सदर जमीन श्री.अभय क्रेन्स प्रा.लि.शेगांव यांना देण्याबाबत ठराव क्र. ६ घेतलेला रद्द करण्याबाबत सतत पाठपुरावा करून बाजार समितीच्या बाजुने निर्णय खेचुन आणाला व लवकरच सदर जागेवर मा.महादेवराजी काकडे साहेब सभापती व सर्व सन्मानिय संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली बाजार समितीचे जिनिंग प्रेसिंगचे जागेवर बोर्ड लावण्यात आले आहे.तसेच लवकरच सदर जागेचा उपयोग बाजार समितीच्या विकासाच्या व शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने करण्यात येईल.

## २) वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीचे रेल्वे स्टेशन रोड कडील उत्तरेकडील बाजार समितीची २.०७ हेक्टर जमीनी बाबत शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्ना बाबत.

वाशिम बाजार समितीने तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने किसान जिनिंग यांना सदर जमिन ९९ वर्षाच्या भाडेपट्टयावर दिली होती.परंतु सदर जमीन ही भाडेपट्टयावर दिल्यानंतर बरेच दिवसापासुन सदर जमिनीचा वापर जिनिंग प्रेसिंग करीता होत नसुन त्याठिकाणी खाली जमिन व जिर्ण झालेल्या इमारतीचे काही अवशेष दिसत आहेत.यावर बाजार समितीचे सभापती मा.श्री.महादेवरावजी काकडे व सर्व सन्मानिय संचालक मंडळ यांनी सदर जागेची पाहणी केली व त्या किसान जिनिंग बाबत करण्यात आलेला भाडेपट्टा सुध्दा पाहण्यात आला त्या भाडेपट्टयामधील अटी क्र.४ ब मध्ये स्पष्ट लिहलेले आहे की,सदर जमिनीचा उपयोग ज्या कामाकरीता दिलेली आहे त्याच कामाकरीता करण्यात यावा.इतर कामाकरीता उपयोग करता येणार नाही.त्यामुळे सदर अटीचे उलंघन झाल्याबाबत मा.सभापती महोदय व सन्मानिय सर्व संचालक मंडळ यांच्या बाजार समितीचे सचिव श्री.वा.आ.सोळंके यांनी आणुन दिले व सदर जागेचा भाडेपट्टा बाजार समितीच्या सभेमध्ये रद्द करावा लागेल असे सुध्दा सांगण्यात आले त्यावर बाजार समितीचे मा.श्री.महादेवरावजी काकडे साहेब सभापती यांच्या आदेशानुसार बाजार समितीचे तातडीचे साधारण सभा दिनांक १३/०७/२०२४ ठराव क्र.४ ब नुसार सदर भाडेपट्टा रद्द करण्याबाबत ठराव पारीत करण्यात आलेला आहे व सदर जागेचा उपयोग बाजार समितीकरीता करण्यात यावा असे सुध्दा सदर ठरावामध्ये नमुद करण्यात आले आहे.

तसेच सदर जागेबाबत मा.उच्च न्यायालय नागपुर येथे केस चालु आहे.सदर केसचा निर्णय बाजार समितीच्या बाजुने लावणे करीता मा.सभापती महोदय व सर्व सन्मानिय संचालक मंडळ प्रयत्नशील आहे.

वरील सर्व बाजार समितीच्या मालमत्ता परत /हस्तगत करण्याचे श्रेय वाशिम बाजार समितीचे सभापती मा.श्री.महादेवरावजी काकडे साहेब व सर्व सन्मानिय संचालक मंडळ व प्रशासन यांना जाते.

## ३) मागील आमसभेमध्ये शेतकऱ्यांनी उपबाजार राजगांव येथील जमिनीवरील केलेल्या अतिक्रमणा बाबत उपस्थित केलेल्या प्रश्ना बाबत.

वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपबाजार राजगांव येथील जमिनीवरील अतिक्रमण केले आहे.परंतु सदर अतिक्रमण  ५ ते ७ वर्षापासुन केलेले असुन सदर जमिन ही शासनाने परीसरातील शेतकऱ्यांच्या हिताच्या व सोईच्या दृष्टीने उपबाजार राजगांव स्थापन करणे करीता राजगांव गट ग्रामपंचायत यांनी दिनांक २५/०७/२००० मध्ये ठराव क्र.६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे ४ हेक्टर जमिन देण्याचा ठराव सर्वानुमते सम्मत करण्यात आला होता.परंतु मा.जिल्हाधिकारी साहेब वाशिम यांच्या आदेश दिनांक

१५ मार्च २००२ नुसार २.५० हेक्टर जमिन आदेशीत करण्यात आली होती.परंतु बाजार समितीने मोजणी केली असता नकाशानुसार गट नं.१४१ मध्ये १.७० हेक्टर क्षेत्र व उर्वरीत २.२४ हेक्टर हे गट नं. १४४ मध्ये दिसत आहे.असे बाजार समितीचे मा.सभापती श्री.महादेवरावजी काकडे व सर्व सन्मानिय संचालक मंडळ यांना कागदपत्रावरून निदर्शनास आले आहे.त्यामुळे उपबाजार राजगांव येथील जमिनी बाबत महसुल कार्यालयाशी पत्रव्यवहार करण्याबाबत बाजार समितीचे सचिव यांना आदेशीत करण्यात आले आहे व मा.सभापती व सर्व संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच उपबाजार राजगांव बाजाराची अतिक्रमण केलेली जमिन बाजार समितीच्या ताब्यात घेवुन त्याजागेवर विकासाच्या दृष्टीने योग्य ती पावले उचलण्यात येतील.

## ४) वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीची जागा ५० हजार स्कु.फुट महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ वाशिम यांच्याकडुन परत घेणे बाबत

वाशिम बाजार समितीचे सभापती यांनी मागील आम सभेमध्ये शेतकऱ्याकरीता नविन हळद या शेतमालाचे नविन मार्केट उभारण्याकरीता वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीने महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ वाशिम यांना दिलेली भाडेतत्वावर जागा १ लाख ५० हजार स्कु. फुट असुन त्यापैकी ५० हजार स्कु.फुट जागेची लिज संपली असुन सदर जागा बाजार समितीच्या ताब्यात घेण्याबाबत बाजार समितीचे सचिव यांना आदेशीत केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचे मुख्य कार्यालय पुणे यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला तसेच सदर जागेचा उपयोग हा वाशिम जिल्हयातील शेतकऱ्यांकरीता हळद हा शेतमाल विक्री करीता नविन मार्केट यार्ड चालु करण्याबाबत सदर जागेची आवश्यकता असल्याबाबत वेळोवेळी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचे वरीष्ठ कार्यालयाशी पत्रव्यवहार करून सुध्दा अद्याप पर्यंत ५० हजार स्कु.फुट जागा बाजार समितीला परत केली नाही.

याबाबत बाजार समितीचे मा.श्री.महादेवरावजी काकडे साहेब व सर्व सन्मानिय संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली सदर ५० हजार स्कु फुट जागा ताब्यात घेवुन लवकरच शेतकऱ्यांकरीता हळद या शेतमालाचे नविन मार्केट चालु करण्यात येईल.

## ५) वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपबाजार अनसिंग येथे विकास कामे करण्याच्या दृष्टीने सुचविले असता उपबाजार अनसिंग येथील जमिनीची ७/१२ ऑनलाईन नसल्याबाबत निदर्शनास आले होते.त्यानुसार डिजिटल ७/१२ तयार करून घेण्यात आली आहे.

वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपबाजार अनसिंग येथे विविध विकासकामे करण्याकरीता मा.श्री.महादेवरावजी काकडे साहेब व सर्व सन्मानियम संचालक मंडळ यांनी कागदपत्राची व उपबाजार अनसिंगचे एकुण कार्यक्षेत्राची

कागदपत्राची पाहणी केली असता त्यांच्या लक्षात आले की,उपबाजार अनसिंग येथील एकुण जमिन क्षेत्र १२ एक्कर असुन त्यापैकी फक्त १२ एक्कर चा लेखी ७/१२ खुप जुनी आढळुन आली होती. त्यानुसार बाजार समितीचे मा.सभापती महोदय यांच्या आदेशानुसार मा.मंडळ अधिकारी साहेब यांच्या मार्फत मा.तहसिलदार साहेब वाशिम यांच्याकडे अहवाल सादर करून उपबाजार अनसिंग येथील ७/१२ ऑनलाईन (डिजिटल) करून घेण्यात आली आहे. तसेच मा.सभापती महोदय व सर्व सन्मानियम संचालक मंडळ यांच्या मार्गदर्शनाखाली अनसिंग उपबाजार येथे लवकरच नविन विकासाच्या दृष्टीने योग्य पाऊल उचलण्यात येईल.

## ६) चिया या शेतमालाकरीता वाशिम कृषी उत्पन्न बाजार समिती ही महाराष्ट्रा तील नंबर १ ची बाजार समिती म्हणुन संबोधण्याचा बहुमान मिळाल्या बाबत.

वाशिम बाजार समितीचे कार्यक्षेत्रामध्ये सन २०२४-२०२५ या वर्षामध्ये चिया या शेतमालाची जवळपास ३३०० हेक्टरवर पेरणी झाली असुन सदर चिया शेतमालाचे विक्री करीता बाजारपेठ किंवा सुविधा उपलब्ध नसल्यामुळे व चिया या शेतमालाचा पेरा वाढल्यामुळे वाशिम बाजार समितीमध्ये चिया या शेतमालाचा लिलाव चालु करणे बाबत. वाशिम जिल्हयाच्या कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी मा.एस.भुनेश्वरी मॅडम यांनी दिलेल्या सुचनेनुसार व मार्गदर्शनाखाली वाशिम बाजार समितीचे संन्मानीय सभापती महोदय यांच्या आदेशानुसार काही संन्मानीय संचालक तथा सचिव यांची एक टिम बनविण्यात आली व मध्यप्रदेश मधील निमज येथे चिया सिड्स या शेतमालाचे खरेदी-विक्री बाबत माहीती व तेथील व्यापारी यांच्याशी संवाद साधण्याकरीता पाठविण्यात आली होती. त्यानुसार निमज कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये २५० पेक्षा अधिक आर्युवेद वनस्पती चा लिलाव कसा केल्या जातो व सदर आर्युवेद वनस्पतीला व्यापाऱ्यांनी खरेदी केल्यानंतर कोठे पाठविल्या जाते या सर्व गोष्टींचा अभ्यास केल्यानंतर तेथील व्यापाऱ्यांसोबत वाशिम बाजार समितीमध्ये चिया या शेतमालाच्या खरेदी बाबत सकारात्मक चर्चा झाल्यानंतर वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दिनांक ११-०२-२०२५ रोजी चिया या शेतमालाच्या खरेदी-विक्रीचा शुभारंभ वाशिम जिल्हयाच्या कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी मा.एस.भुनेश्वरी मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. त्यावेळी मा.जिल्हा कृषी अधिकारी,वाशिम मा.अधिक्षक आत्मा कृषी कार्यालय वाशिम तथा वाशिम बाजार समितीचे संन्मानीय सभापती महोदय, मा.उपसभापती महोदय तथा सर्व संन्मानीय संचालक तसेच सचिव व सर्व कर्मचारी वर्ग उपस्थीत होता.तसेच चिया या शेतमालाकरीता बाजारपेठ उपलब्ध करून देणारी महाराष्ट्रातील पहीली बाजार समिती म्हणुन संबोधण्यात येत आहे.

तसेच वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व संन्मानीय संचालक मंडळांचा व बाजार समितीचे प्रशासनाचा मानस आहे की, मध्यप्रदेश येथील निमज बाजार समितीप्रमाणे मिनी निमज म्हणुन वाशिम बाजार समितीमध्ये सर्वच

उदा.चिया,कलुंजी,अश्वगंधा,राई,कस्तुरी भेंडी असे इतर सर्व मसाले पिके व वनस्पतीजन्य नवनविन पिकांची पेरणी करावी व शेतकऱ्यांनी एकाच सोयाबीन या पीकावर अवलंबुन न राहता वरीलप्रमाणे पिकांचा अवलंब करून आपला आर्थीक फायदा करून घ्यावा.असे आव्हान वाशिम बाजार समितीकडुन करण्यात येत आहे.

**७) वाशिम येथील दुग्ध शितकरणाची जागा वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीला मिळणे करीता बाजार समितीकडुन केलेल्या पाठपुराव्या बाबत.**

वाशिम येथील दुग्ध शितकरणाची जिर्ण झालेली इमातर व गोडावुन व खुली जागा वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीला मिळणे बाबत बाजार समितीचे सर्व साधारण सभेतील ठराव पारीत करून सर्व कागदपत्रानिशी प्रस्ताव तयार करून मा.सभापती महोदय यांचे आदेशानुसार सबंधीत विभागाला पाठविण्यात आला असुन त्यावर योग्य तो बाजार समितीकडुन पाठपुरावा करणे चालु आहे.सदर वाशिम येथील दुग्ध शितकरणाची जिर्ण झालेली इमातर व गोडावुन व खुली जागा बाजार समितीला मिळाल्यानंतर त्याठिकाणी स्वतंत्र गुरांचा बाजार व भाजीपाला मार्केट यार्ड उभारण्यात येणार आहे. त्यामुळे गुरांचा व्यापार करणारे व्यवसायीकांना व जनावरे विक्री करणाऱ्यांना स्वतंत्र बाजार उपलब्ध होईल. तसेच वाशिम जिल्हयामध्ये भाजीपाला उत्पादक शेतकऱ्यांना त्यांचा भाजीपाला विक्री करीता नविन बाजार उपलब्ध करून दिल्या जाईल. त्याबाबत वाशिम बाजार समितीचे सन्मानीय सभापती महोदय व सर्व संचालक मंडळ तसेच प्रशासनाकडुन योग्य तो पाठपुरावा करून लवकरच वरीलप्रमाणे स्वतंत्र बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात येईल.

८) वाशिम बाजार समितीचे यार्डमध्ये चालु असलेल्या नविन विकासात्मक बांधकामा बाबत.

वाशिम बाजार समितीचे यार्डमध्ये नविन चालु असलेले विविध विकास कामे (बांधकाम) चालु करण्यात आली असुन मध्यंतरी काही तांत्रीक कारणामुळे सदर बांधकामे बंद ठेवण्यात आली होती. परंतु बाजार समितीचे सन्मानीय सभापती महोदय यांचे मार्गदर्शनाखाली वरील तांत्रीक कारणाचे पाठपुरावा करणे चालु आहे. सदर तांत्रीक अडचण लवकरच निकाली निघाल्यानंतर सदर नविन विकासात्मक बांधकामे पुर्ववत चालु करण्यात येतील.

**तरी वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीचे नविन पदारूढ संचालक मंडळ यांच्या मागील २ वर्षाच्या कालावधीमध्ये बाजार समितीचे हिताच्या दृष्टीने व मालमत्ता वाचविण्याच्या दृष्टीने योग्य ती पावले उचलण्यात आले आहेत.**

तसेच अहवाल वर्षात समितीचे कामकाजात सुधारणा होण्याचे दृष्टीने मा.ना.श्री.दत्तामामा भरणे साहेब,कृषी मंत्री तथा पालकमंत्री वाशिम जिल्हा, मा.खा.श्री.संजयजी देशमुख साहेब, मा.खा.श्री.अनुपजी धोत्रे साहेब, मा.खा.भावनाताई गवळी, मा.आ.श्री.श्यामचरणजी खोडे साहेब,मा.आ.श्री.अमीतजी झनक साहेब व वाशिम जिल्हयामधील सर्व लोकप्रतीनिधी, मा.श्री.गितेशचंद्र साबळे साहेब जिल्हा उपनिबंधक वाशिम, मा.श्री.महेश डी. कच्छवे साहेब सहायक निबंधक,वाशिम यांचे बहुमोल सहकार्य बाजार समितीला अहवाल वर्षात लाभला आहे त्यांचे आभार मानण्यात येत आहे.

तसेच वाशिम बाजार समितीचे कामकाजा मध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने लेखा अधिकारी श्री.व्ही.के.लहाने साहेब वाशिम तथा त्यांचे सहकारी यांचे बहुमोल सहकार्य बाजार समितीला अहवाल वर्षात लाभले आहे त्यांचे आभार मानण्यात येत आहे.

तसेच बाजार समितीचे कामकाजात अडत,व्यापारी ,हमाल,मापारी,मदतनीस यांनी कामकाज चालविण्यात योग्य ते सहकार्य दिले त्याचे सुध्दा आभार मानण्यात येते आहे.

बाजार समितीचे सर्व कर्मचाऱ्यांचे परिश्रमामुळे बाजार समिती विकासाचे लक्ष पुर्ण करू शकली या संपुर्ण यशाचे श्रेय बाजार समिती कर्मचाऱ्यांना जाते.

शेतकऱ्यांनी त्याचा शेतीमाल मार्केट मध्ये विकावयास आनुन बाजार समितीचा आर्थीक विकास साधण्यात मदत केली त्यांचे या ठिकाणी बाजार समिती आभार व्यक्त करते.

तसेच बाजार समितीचे सर्व संचालक मंडळ तथा प्रशासक मंडळ शासकीय प्रशासक यांनी बाजार समितीचे विकासाचे दृष्टीने लक्ष केंद्रीत करून बाजार समितीचे उत्पन्न कसे जास्त वाढेल याकडे लक्ष दिले व कास्तकारांना सर्वसोयी उपलब्ध करून देण्यात बाबत सहकार्य केले त्या बाबत आभार मानण्यात येत आहे.

# कार्यालय
# कृषी उत्पन्न बाजार समिती वाशिम ता.जि.वाशिम
# कर्मचारी यादी (सन २०२४-२०२५)

| अ.क्र | कर्मचाऱ्यांचे नाव | पद | मो.नं. |
|---|---|---|---|
| १. | श्री. वामन आनंदा सोळंके | प्र.सचिव | ८८३०६२१४२१ |
| २. | श्री. अनिल पांडुरंग राठोड | सह.सचिव | ८२७५८३७७२६ |
| ३. | श्रीमती व्दारकाबाई रामेश्वर धाडवे | सह.सचिव | ---- |
| ४. | श्री. प्रविण नारायण लांडकर | सह.सचिव | ९९२२०४००३४ |
| ५. | श्री. उमेश रामेश्वर महाले | सांख्यिकी | ९८२२१२९३११ |
| ६. | श्री. जगदीश सोपान बुधे | पर्यवेक्षक | ९८५०२३०२९६ |
| ७. | श्री. रामहरी विश्वनाथ वानखेडे | निरीक्षक | ८९९९५५६८७० |
| ८. | श्री. योगेश लक्ष्मण बुंधे | पर्यवेक्षक | ९०११६६९०१२ |
| ९. | श्री. उमेश दत्ताराव मापारी | निरीक्षक | ८८०५४८२७८८ |
| १०. | श्री. राहुल गलसिंग चव्हाण | रोखपाल | ९६५७९८२१७१ |
| ११. | श्री. माधव लक्ष्मण दुम्हारे | वरीष्ठ लिपीक | ९६८९६९९६८५ |
| १२. | श्री. सुमित माधवराव गोटे | कापुस प्रतवारीकार | ९८८१९१४८८९ |
| १३. | श्री.उल्हास आनंदा लांडगे | धान्य प्रतवारीकार | ९५७९५८२४८१ |
| १४. | श्री. माधव हरीभाऊ गोटे | कनिष्ठ लिपीक | ९९२११३७६०१ |
| १५. | श्री. हर्षवर्धन चिंतामण खंडारे | कनिष्ठ लिपीक | ७९७२२७९८०१ |
| १६. | श्री. मोहन मोतीराम भालेराव | कनिष्ठ लिपीक | ९६२३६४५१२४ |
| १७. | श्री. गंगा बुद्धु उदिवाले | कनिष्ठ लिपीक | ९७६७६७१४५५ |
| १८. | श्री. बाळु परसराम गोटे | कनिष्ठ लिपीक | ९९६०९९४८२४ |
| १९. | श्री. ऋषिकेश रामदास गोटे | कनिष्ठ लिपीक | ९०४९६१७७५४ |
| २०. | श्री. योगेश कुंडलीक कोंघे | कनिष्ठ लिपीक | ९८३४६८६५१९ |
| २१. | श्री. शुभम प्रकाश राजे | कनिष्ठ लिपीक | ९६३७८५०६३२ |
| २२. | श्री. तेजस सुनिल शिंदे | कनिष्ठ लिपीक | ८०१००५३७२६ |
| २३. | श्री. आशिष वसंता राठोड | कनिष्ठ लिपीक | ७०५७६५८०२७ |
| २४. | श्री.वैभव आत्माराम मुठाळ | कनिष्ठ लिपीक | ९७६३८५६३८४ |
| २५. | श्री.संतोष गजानन टेकाळे | कनिष्ठ लिपीक | ९४२०३९७९०७ |
| २६. | श्री.अभिषेक रामराव विभुते | वाहन चालक | ९३७०७६८९५१ |
| २७. | श्री. बाळु मधुकर इंगोले | शिपाई | ८४८३९३६५५३ |
| २८. | श्रीमती स्नेहा ईश्वर गवई | शिपाई | ---- |
| २९. | सौ. उषा विष्णु भोडंणे | शिपाई | ९६३७९७१०२१ |
| ३०. | श्री. अविनाश भारत चव्हाण | शिपाई | ७६२०३९६४६७ |
| ३१. | श्री. राजु प्रताप मुसळे | शिपाई | ९३७३६३२००१ |
| ३२. | श्री. नितिन गजानन मोरे | शिपाई | ९३०९९६८९८२ |
| ३३. | श्री. गणेश लक्ष्मण चौधरी | शिपाई | ९१३०३४९५७८ |
| ३४. | श्री. ओम गणेश मापारी | शिपाई | ९०२२५९३२५३ |
| ३५. | श्री. गणेश मनोहर बर्वे | चौकीदार | ९३०७३२७६५१ |
| ३६. | श्री. विशाल मंचकराव इंगळे | लाईनमन | ८६६९०९९७१९ |

# कार्यालय
# कृषी उत्पन्न बाजार समिती वाशिम ता.जि.वाशिम
# कार्यरत संचालक मंडळ

| अ.क्र. | नाव | पद | सही |
|---|---|---|---|
| १) | मा.श्री.महादेव पुंडलीक काकडे | सभापती | ९७६३२०२६२२ |
| २) | मा.श्री.गोवर्धन अभिमान चव्हाण | उपसभापती | ९८२२०५९५१८ |
| ३) | मा.श्री.दामोदर यशवंता गोटे | सदस्य | ९६३७०००९०९ |
| ४) | मा.श्री.विठ्ठल ऊर्फ राजुभाऊ पांडुरंग चौधरी | सदस्य | ९९२२४०१२४० |
| ५) | मा.श्री.दत्ता विठोबा गोटे | सदस्य | ९६६५४४७६६६ |
| ६) | मा.श्री.नथ्थुजी नामदेवराव कापसे | सदस्य | ७७४१८४०८५८ |
| ७) | मा.श्री.सुभाषराव काशीराम चौधरी | सदस्य | ९६५७८००५७६ |
| ८) | मा.सौ.प्रमिला रामचंद्र इढोळे | सदस्या | ८६६८६७४५६४ |
| ९) | मा.सौ.सविता गजानन काटेकर | सदस्या | ९७६३७५५५१२ |
| १०) | मा.सौ.रेखा सुरेश मापारी | सदस्या | ९८५०३२१८१९ |
| ११) | मा.श्री.सुभाष कनिराम राठोड | सदस्य | ९६५७९७७९१३ |
| १२) | मा.श्री.चरण दाजीबा गोटे | सदस्य | ९९२२८९६३५४ |
| १३) | मा.सौ.आशा संजय मापारी | सदस्या | ९८५०६३३२८५ |
| १४) | मा.श्री.विनोद उत्तम पट्टेबहादुर | सदस्य | ९८८११८०५४६ |
| १५) | मा.श्री.नंदकिशोर शंकर भोयर | सदस्य | ९२२६१७३९३० |
| १६) | मा.श्री.सुरेश भगवान भोयर | सदस्य | ९६८९७३८०२१ |
| १७) | मा.सौ.सारीका नितीन करवा | सदस्या | ९४२२१६१४५७ |
| १८) | मा.श्री.हिरा रन्नु जानीवाले | सदस्य | ९८२२९५०३५५ |
| १९) | मा.सहाय्यक निबंधक सह.संस्था वाशिम | सदस्य | ०७२५२-२३२१४७ |